खालून आग, वर आग, आग बाजूंनी
समशेर उसळली सहस्त्र क्रूर इमानी
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यात... ३।

दगडावर दिसतिल अजुनि तेथल्या टाचा
ओढ्यात तरंगे अजुनि रंग रक्ताचा
क्षितिजावर उठतो अजुनि मेघ मातीचा
अद्याप विराणी कुणी वार्यावर गात... ४।

film: singer: Asha Bhonsle lyrics: Arati Prabhu music:

॥ ये रे घना ये रे घना ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: आरती प्रभू

ये रे घना, ये रे घना
न्हाऊ घाल माझ्या मना... धृ।

फुले माझी अळुमाळू, वारा बघे चुरगळू
नको नको म्हणताना, नको नको म्हणताना
गंध गेला रानावना... १।

टाकुनिया घरदार, नाचणार नाचणार
नको नको म्हणताना, नको नको म्हणताना
मनमोर भरराना... २।

नको नको किती म्हणू, वाजणार दूर वेणू
बोलावितो सोसाट्याचा, वारा मला रसपाना
वारा मला रसपाना... ।

त्या क्रूर लाल ज्वाळा आवर्त त्यास सुटले
वणव्यात बाग जळला आता गुलाब कुठले... धृ।

केला कशास तेव्हा आकांत पाखरांनी
हृदयात आज त्याचे पडसाद खोल उठले... १।

झाले उजाड अवघे उरले न शेष काही
राखेत जीवनाच्या सारेच रंग विटले... २।

ठेवू कशास मागे भावार्थ अक्षरांचे
सुचले न तो मनाचे उघडून डाग मिटले... ३।

film: singer: Hridayanath Mangeshkar
lyrics: Suryakant Khandekar music: Hridayanath Mangeshkar

॥ त्या फुलांच्या गंधकोषी ॥

गायक: हृदयनाथ मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: सूर्यकांत खांडेकर

त्या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का
त्या प्रकाशी तारकांच्या ओतिसी तू तेज का
त्या नभाच्या नीलरंगी होवुनी आहेस का
जात वायूंच्या स्वरांनी सांग तू आहेस का... धृ।
मानवाच्या अंतरीचा प्राण तू आहेस का
वादळाच्या सागराचे घोर ते तू रूप का
जीवनी आवर्षणारा तू कृपेचा मेघ का
आसमंती नाचणारी तू विजेची रेघ का... १।
जीवनी संजीवनी तू माउलीचे दूध का
कष्टणार्या बांधवांच्या रंगसी नेत्रात का
मूर्त तू मानव्य का रे बालकांचे हास्य का
या इथे अन् त्या तिथे रे सांग तू आहेस का... २।

film: singer: Suman Kalyanpur lyrics: music:

॥ वाट इथे स्वप्नातिल ॥

गायिका: सुमन कल्याणपूर

वाट इथे स्वप्नातिल संपली जणू
थांबवितो धारांनी सावळा घनू... धृ।

आजूबाजूच्या पानांनी वेढली ही निळाई
चिंतनात बैसली ग मंत्रमुग्ध राई
फुलांनी नहाली गडे बावरी तनू... १।

दर्यांतुनी आनंदला पाणओघ नाचरा
आसमंत भारितो ग गानसूर हासरा
माथ्यावरी दिसते ग इंद्राचे धनू... २।

film: singer: Lata Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ वेडात मराठे वीर दौडले सात ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर

म्यानातुन उसळे तलवारीची पात
वेडात मराठे वीर दौडले सात... धृ।

ते फिरता बाजुस डोळे किंचित ओले
सरदार सहा सरसावुनी उठले शेले
रिकिबीत टाकले पाय झेलले भाले
उसळले धुळीचे मेघ सात निमिषात... १।

आश्चर्यमुग्ध टाकून मागुती सेना
अपमान बुजविण्या सात अर्पुनी माना
छावणीत शिरले थेट भेट गनिमांना
कोसळल्या उल्का जळत सात दरियात... २।

नाव भिन्न परी मी ती प्रीती
चैतन्याचा पूर तेधवा गंगेला आतला... १।

अफाट जगती जीवरजःकण
दुवे निखळता कोठुन मीलन
जीव भुकेला हा तुजवाचून
जन्मामधुनी पिसाट फिरता भेट घडे आजला... २।

ITRANS Song Book: 97.s

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ तरुण आहे रात्र अजुनी ॥

गायिका: आशा भोसले
गीत: सुरेश भट

तरुण आहे रात्र अजुनी राजसा निजलास का रे
एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का रे... धृ।

अजुनही विझल्या न गगनी तारकांच्या दीपमाला
अजुन मी विझले कुठे रे हाय तू विझलास का रे... १।

सांग ह्या कोजागिरीच्या चांदण्याला काय सांगू
उमलते अंगांग माझे आणि तू मिटलास का रे... २।

बघ तुला पुसतोच आहे पश्चिमेचा गार वारा
रातराणीच्या फुलांचा गंध तू लुटलास का रे... ३।

उसळती हृदयात माझ्या अमृताच्या धुंद लाटा
तू किनार्यासारखा पण कोरडा उरलास का रे... ४।

ITRANS Song Book: 98.s

film: singer: Vasantrao Deshpande lyrics: music:

॥ तेजोनिधि लोह गोल ॥

गायक: वसंतराव देशपांडे
संगीत: जितेंद्र अभिषेकी
नाटक: कट्यार काळजात घुसली

तेजोनिधि लोह गोल, भास्कर हे गगनराज
दिव्य तुझ्या तेजाने झगमगले भुवन आज
हे दिनमणी व्योमराज, भास्कर हे गगनराज
तेजोनिधी लोह गोल... धृ।
कोटि कोटि किरण तुझे अनल शरा उधळिती
अमृत कण परि होऊनि अणुरेणू उजळिती
तेजातच जनन मरण...
तेजातच जनन मरण, तेजातच नवीन साज... १
ज्योतिर्मय मूर्ति तुझी ग्रहमंडल दिव्यसभा
दाहक परि संजीवक, अरुणारुण किरणप्रभा
होवो जीवन विकास...
होवो जीवन विकास, वसुधेची राख लाज... २

ITRANS Song Book: 99.s

film: singer: Sudhir Phadke lyrics: music:

॥ तुझे रूप चित्ती राहो ॥

गायक: सुधीर फडके
अभंग: गोरा कुंभार

तुझे रूप चित्ती राहो मुखी तुझे नाम
देह प्रपंचाचा दास सुखे करो काम... धृ।

देहधारी जो जो त्याचे विहित नित्यकर्म
सदाचार नीतीहुनी आगळा न धर्म
तुला आठवावे गावे हाच एक नेम... १।

तुझ्यापरी वाहिला मी देहभाव सारा
उडे अंतराळी आत्मा सोडुनी पसारा
नाम तुझे घेतो गोरा म्हणुनि आठ याम... २।

ITRANS Song Book: 100.s

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ त्या क्रूर लाल ज्वाळा ॥

गायक: रामदास कामत

सूर मागू तुला मी कसा, जीवना तू तसा मी असा ... धृ।
एकदाही मनासारखा, तू न झालास माझा सखा
खेळलो खेळ झाला जसा ... १
तू मला, मी तुला पाहिले, एकमेकांस न्याहाळिले
दुःख माझा तुझा आरसा ... २

ITRANS Song Book: 93.s

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ सुहास्य तुझे ॥

गायिका: आशा भोसले

सुहास्य तुझे मनास मोही
जशी न मोही सुरासुरा ही ... धृ।

तव लोचनी या प्रकाश विलसे
तयासि लोभे बघ चंद्रिका ही ... १।

तव यौवनाचा वसंत बहरे
तयासि लोभे बघ कोकिळ हा ही ... २।

ITRANS Song Book: 94.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: सुरेश भट

सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे
अजूनही वाटते मला की अजूनही चांदरात आहे ... धृ।

कळे न मी पाहते कुणाला कळे न हा चेहरा कुणाचा
पुन्हा पुन्हा भास होत आहे तुझे हसू आरशात आहे ... १।

सख्या तुला भेटतील माझे तुझ्या घरी सूर ओळखीचे
उभा तुझ्या अंगणी फुलांचा अबोल हा पारिजात आहे ... २।

उगीच स्वप्नात सावल्यांची कशास केलीस आर्जवे तू
दिलेस का प्रेम तू कुणाला तुझ्याच जे अंतरात आहे ... ३।

ITRANS Song Book: 95.s

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ स्वप्नातल्या कळ्यांनो ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: अनिल मोहिले

स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाच केव्हा
गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा ... धृ।

रेखाकृती सुखाच्या चित्ती चितारलेल्या
साशंक कल्पनांनी सहजी विरून गेल्या
कधी सोशिला उन्हाळा कधी लाभला विसावा ... १।

नैराश्यकृष्णमेघी आशा कधी बुडावी
विरहात चिंब भिजुनी प्रीती फुलून यावी
काट्याविना न हाती केव्हा गुलाब यावा ... २।

ITRANS Song Book: 96.s

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ स्वरगंगेच्या काठावरती ॥

गायक: अरुण दाते

स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला
गतजन्मीची खूण सापडे ओळखले का मला ... धृ।

वदलीस तू मी सावित्री ती
शकुंतला मी मी दमयंती

चित्रपट: भोळी-भाबडी

साधुसंत सांगुन गेले त्याचा बोध घेई
सावधान होई वेड्या सावधान होई... ध्रु।

सोने आणि रूपे आम्हा मृत्तिकेसमान
तुकाराम बोले त्याची मनी ठेव जाण
सुखाची ही पायवाट काट्यांतुन जाई... १।

मना सज्जनांच्या संगे धरी भक्तिपंथ
रामदास बोले त्याची मनी धरी खंत
आभाळाचा डोळा सारे खेळ तुझे पाही... २।

रोज मानवाची हत्या रोज वाटमारी
पापामधे झालं नाही कुणी वाटेकरी
वाल्याकोळी नारदाच्या लीन झाला पायी... ३।

सावधान !!!

॥ शालू हिरवा ॥

शालू हिरवा पाचू नि मरवा वेणी तिपेडी घाला
साजणी बाई येणार साजण माझा
गोर्या भाळी चढवा जाळी नवरत्नांची माला
साजणी बाई येणार साजण माझा... धृ।

चूल बोळकी इवलीइवली भातुकलीचा खेळ ग
लुटुपुटीच्या संसाराची संपत आली वेळ ग
रेशमी धागे ओढिती मागे व्याकुळ जीव हा झाला... १।

सूर गुंफिते सनई येथे झडे चौघडा दारी
वाजतगाजत मिरवित येईल घोड्यावरुनी स्वारी
ही वरमाला घालीन त्याला मुहूर्त जवळी आला... २।

मंगल वेळी मंगल काळी डोळा का ग पाणी
साजण माझा हा पतिराजा मी तर त्याची राणी
अंगावरल्या शेलारीला बांधुन त्याचा शेला... ३।

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ शारद सुंदर चंदेरी राती ॥

गायिका: आशा भोसले

शारद सुंदर चंदेरी राती
स्वप्नांचा झुलतो झुला
थंड या हवेत घेऊनी कवेत
साजणा झुलव मला
साजणा रे मोहना रे ऐक ना रे
तुझ्याच साठी रे तुझ्याच साठी
सगे सोयरे मी सारिले पाठी... धृ।

मोहन मधुर राती
भराला येऊ दे प्रीती
प्रीतीची ही जनरीती
कशाला कुणाची भीती
झाडामागे चांद हा वरती आला
ये ना ये ना आतुर जीव हा झाला
मी भुलावे स्वैर व्हावे गीत गावे... १।

वार्यात लहर मंद
फुलांचा मादक गंध
मोगरा चमेली कुंद
जीवाला करिती धुंद
माझ्या देही पुनवचांदणे साजे
झाडामध्ये प्रीतीची पावरी वाजे
आज राया धुंद काया मोहमाया... २।

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ सूर मागू तुला मी कसा ॥

गायक: अरुण दाते

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ समईच्या शुभ्र कळ्या ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: आरती प्रभू

समईच्या शुभ्र कळ्या उमलवून लावते
केसांतच फुललेली जाई पायाशी पडते... धृ।

भुवयांच्या फडफडी दिठीच्याही मागेपुढे
मागेमागे राहिलेले माझे माहेर बापुडे... १।

काचणार्या आसवांना पेंग येते चांदणेची
आजकाल झाले आहे विसराळू मुलखाची... २।

थोडी फुले माळून ये डोळा पाणी लावून ये
पदराच्या किनारीला शिवशिवून ग ये... ३।

हसशील हास मला मला हसूही सोसेना
अश्रू झाला आहे खोल चंद्र होणार का दुणा... ४।

film: singer: Arun Date, Sudha Malhotra lyrics: music:

॥ संधिकाली या अशा ॥

गायक: अरुण दाते, सुधा मल्होत्रा

संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा
चांद येई अंबरी
चांदराती रम्य या, संगती सखी प्रिया
प्रीत होई बावरी... धृ।

मुग्ध तू नि मुग्ध मी, अबोल गोड संभ्रमी
एकरूप संगमी
रातराणीच्या मुळे, श्वास धुंद परिमळे
फुलत प्रीतिची फुले
प्रणयचित्र हे असे, कानी ऐकू येतसे
गीती शब्द ना जरी... १।

सांजरंगी रंगुनी, नकळताच दंगुनी
हृदयतार छेडुनी
युगुलगीत गाऊनी, एकरूप होवुनी
देऊ प्रीत दावुनी
प्रणयचित्र हे दिसे, रंगसंगती ठसे
कुंचला नसे जरी... २।

film: Honaji Bala singer: lyrics: music:

॥ सांगा मुकुंद कुणी हा पाहिला ॥

चित्रपट: होनाजी बाळा
गीत: होनाजी बाळा

सांगा मुकुंद कुणी हा पाहिला... धृ।

रासक्रीडा करिता वनमाळी हो
सखे होतो आम्ही विषयविचारी
टाकुनि गेला तो गिरिधारी
कुठे गुंतून बाई हा राहिला... १।

गोपी आळविती हे व्रजभूषणा हे
वियोग आम्हालागी तुझा ना सहाहे
भावबळे मनी धाव ज्याच्या हो
बोलावून सुताप्रति नंदजीच्या
प्रेमपदी अन् कुलटिळकाच्या
म्हणे होनाजी देह हा वाहिला... २।

film: singer: Vasantrao Deshpande lyrics: music:

॥ सावधान होई वेड्या ॥

गायक: वसंतराव देशपांडे

बेधुंद आज आसमंत सारा
कुंजात गात मंद धुंद वारा
दाटे उरी प्रिया तुझा इशारा
देहातही फुले असा शहारा
तुझा इशारा असा शहारा ... १।

लाजेत आज ही फुले नहाती
गाली अनार प्रीतगीत गाती
तू ये निशा अशी करे पुकारा
दे ये प्रिया मला तुझा निवारा
तुझा निवारा तुझा निवारा ... २।

ITRANS Song Book: 83.s

film: singer: Ajit Kadkade lyrics: music:

॥ सांग प्रिये सांग प्रिये ॥

गायक: अजित कडकडे

सांग प्रिये, सांग प्रिये, घन भरून आले
पैलतिरी या अवेळी मेघ आळविले ... धृ।
दशदिशा वादळी अंतरी काजळी
संधिकालि या इथे अन्धारुन आले ... १।
दाटले आज गगन त्यात तुझे सजल नयन
पापणीत आसवांत गहिवरून आले ... २।

ITRANS Song Book: 84.s

film: singer: Lata, Usha, Hridaynath, Asha lyrics: music:

॥ सागरा प्राण तळमळला ॥

गायक: लता, उषा, हृदयनाथ मंगेशकर आणि आशा भोसले
गीत: स्वातंत्र्यवीर सावरकर

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला, तळमळला, सागरा ... धृ।

भूमातेच्या चरणतला तुज धूता, मी नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशी चल जाऊ, सृष्टिची विविधता पाहू
तयी जननीहृद् विरहशंकितही झाले, परि तुवा वचन तिज दिधले
मार्गज्ञ स्वये मीच पृष्ठी वाहीन, त्वरित या परत आणीन
विश्वसलो या तव वचनी मी, जगदनुभव योगे बनुनी मी
तव अधिकशक्त उद्धरणी मी, येईन त्वरे कथुन सोडिले तिजला ... १।

शुकपञ्जरी वा हरीण शिरावा पाशी, ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहू यापुढती, दशदिशा तमोमय होती
गुणसुमने मी वेचियली या भावे, की तिने सुगंधा घ्यावे
जरि उद्धरणी व्यय न तिचा हो साचा, हा व्यर्थ भार विद्येचा
ती आम्रवृक्षवत्सलता रे, नवकुसुमयुता त्या सुलता रे
तो बालगुलाबही आता रे, फुलबाग मला हाय पारखा झाला ... २।

नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा, मज भरतभूमीचा तारा
प्रासाद इथे भव्य परि मज भारी, आईची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य प्रिय मज साचा, वनवास तिच्या जरि वनीचा
भुलविणे व्यर्थ हे आता रे, बहु जिवलग गमते चित्ता रे
तुज सरित्पते जी सरिता रे, तद्विरहाची शपथ घालितो तुजला ... ३।

या फेनमिषे हससी निर्दया कैसा, का वचन भंगिसी ऐसा
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरविते, भिउनि का आंग्लभूमीते
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी, मज विवासनाते देशी
जरि आंग्लभूमीभयभीता रे, अबला न माझीही माता रे
कथिल हे अगस्तिस आता रे, जो आचमनी एक क्षणी तुज प्याला ... ४

ITRANS Song Book: 85.s

॥ सहज तुला गुपित एक सांगते दुपारी ॥

सहज तुला गुपित एक सांगते दुपारी
डोळियांत आली गडे प्रीत माझी लाजरी ... धृ
बैसले ओटीवरी नजर वळे अंगणी
अंगणात बहरते रानजाई देखणी
जाईखाली उभा असे हासरा शिकारी ... १।
सांजवेळी गोठ्यातली गाय लागे हंबरू
सोडते गं धारेसाठी ओढ घेई वासरू
गोठ्यामधे दिसे सखे सावळा मुरारी ... २।
पहाटेला ओठांवरी गीत एक जागले
अंतरात कोण ते हळुच बाई बोलले
ओढाळले मन नेई माझिया सासरी ... ३।

मेघा असशी तू आकाशी
वर्षातून तू कधी वर्षसी
वर्षामागून वर्षची गळले करसी नित बरसात... ३।

ITRANS Song Book: 79.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ राजसा जवळी जरा बसा ॥

गायिक: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर

राजसा, जवळी जरा बसा, जीव हा पिसा तुम्हावीण बाई
कोणता करू शिणगार, सांगा तरी काही... धृ।
त्या दिशी करुन दिला विडा, पिचला माझा चुडा, कहर भलताच
भलताच रंगला कात लाल ओठात... १।
या तुम्ही शिकविल्या खुणा, सख्या सजणा, देह सतवार
सोसता न येइल अशी दिली अंगार... २।
मी ज्वार, नवतीचा भार, अंग जरतार, ऐन हुरड्यात
तुम्ही नका जाऊ साजणा हिवाळी रात... ३।

ITRANS Song Book: 80.s

film: singer: Anuradha Paudwal lyrics: music:

॥ रसिका मी कैसे गाऊ गीत ॥

गायिका: अनुराधा पौडवाल

रसिका मी कैसे गाऊ गीत
दाटून आले घन आसवांचे
मिटलेल्या पापणीत... धृ।

तुटल्या मनाच्या हळुवार तारा
गेला सुरांचा जळुनी फुलोरा
नाचे प्रलय लयीत... १।

मैफल सुखाची झाली विराणी
उरे वेदनांची जखमी कहाणी
रडते स्वप्न व्यथित... २।

ITRANS Song Book: 81.s

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ रेशमाच्या रेघांनी ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: आनंदघन (लता मंगेशकर)

रेशमाच्या रेघांनी लालकाळ्या धाग्यांनी
कर्नाटकी कशिदा मी काढीला
हात नका लावू माझ्या साडीला... धृ।
नवी कोरी साडी लाख मोलाची
भरली मी नक्षी फुलयेलाची
गुंफियले राघूमोर राघूमोर जोडीला... १।
जात होते वटेनं मी तोर्यात मी तोर्यात
अवचित आला माझ्या होर्यात जी होर्यात
तुम्ही माझ्या पदराचा शेव का हो ओढीला... २।
भीड कही ठेवा आल्यागेल्याची
मुर्वत राखा दहा डोळ्यांची
काय म्हणू बाई बाई तुमच्या ह्या खोडीला... ३।

ITRANS Song Book: 82.s

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ रुपेरी वाळूत ॥

गायिका: आशा भोसले

रुपेरी वाळूत माडांच्या बनात ये ना
बनात ये ना जवळ घे ना
चंदेरी चाहूल लावीत प्रीतीत ये ना
प्रीतीत ये ना जवळ घे ना... धृ।

गायक: वसंतराव देशपांडे, अनुराधा पौडवाल
चित्रपट: अष्टविनायक
संगीत: अरुण पौडवाल

प्रथम तुला वंदितो कृपाळा
गजानना गणराया... धृ।

विघ्नविनाशक गुणीजनपालक दुरिततिमिरहारका
चिंतामणी तू दुःखविदारक तूच तुझ्यासारखा
वक्रतुण्ड ब्रह्माण्डनायका विनायका प्रभुराया... १।

सिद्धिविनायक तूच अनंता शिवात्मजा मंगला
सिंधुरवदना विद्याधीशा गणाधिपा वत्सला
तूच ईश्वरा साह्य करावे हा भवसिंधु तराया... २।

गजवदना तव रूप मनोहर शुक्लांबर शिवसुता
चिंतामणी तू अष्टविनायक सकलांची देवता
ऋद्धिसिद्धिच्या वरा दयाळा देई कृपेची छाया... ३।

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ प्रथम तुज पाहता ॥

गायक: रामदास कामत
चित्रपट: मुंबईचा जावई

प्रथम तुज पाहता जीव वेडावला
उचलुनी घेतले निजरथी मी तुला... धृ।

स्पर्श होता तुझा विसरलो भान मी
धुंद श्वासातला प्राशिला गंध मी
नयन का देहही मिटुनी तू घेतला... १।

जाग धुंदीतुनी मजसि ये जेधवा
कवळुनी तुजसि मी चुंबिले तेधवा
धावता रथपथी पळभरी थांबला... २।

film: singer: Shailendra Singh, Usha Mangeshkar
lyrics: music:

॥ प्रीतीचं झुळझुळ पाणी ॥

गायक: शैलेंद्र सिंग (शै.), उषा मंगेशकर (उ.)

उ. प्रीतीचं झुळझुळ पाणी वार्याची मंजुळ गाणी
रोमांच सर्वांगी गेले मी न्हाऊनी... धृ।
शै. हा जीव वेडा होई थोडा थोडा
वेड्या मनाचा बेफाम घोडा
दौडत आला सखे तुझा बंदा
चल प्रेमाचा रंगू दे विडा
उ. साजणा मी तुझी कामिनी... १।

उ. मी धुंद झाले मनमोर डोले
पिसार्यातुनी हे खुणावीत डोळे
डोळस चाळे खुळी मीच झाले
स्वप्न फुलोरा मनात झुले
शै. मी तुझा हंस गं मालिनी... २।

film: singer: Suman Kalyanpur lyrics: music:

॥ प्रियावीण उदास वाटे रात ॥

गायिका: सुमन कल्याणपूर

रिमझिम झरती श्रावणधारा धरतीच्या कलशात
प्रियावीण उदास वाटे रात... धृ।

बरस बरस तू मेघा रिमझिम
आज यायचे माझे प्रियतम
आतुरलेले लोचन माझे बघती अंधारात... १।

प्रासादी या जिवलग येता
कमळमिठीमधे चिंब भेटता
बरस असा की प्रिया न जाईल माघारी दारात... २।

संगीत: यशवंत देव

शब्दाळा पुरेशा न होती, स्पर्श सारेच सांगून जातो
लोचनाआड जातेस जेव्हा, पापणीला तुझा रंग येतो ... धृ।

आर्त कोमेजलेल्या मनाची, पाकळी पाकळी खिन्न झाली
सांत्वनाच्या तुझ्या फुंकरीने, प्राण घेऊन आली नव्हाळी
एक हुंकार देतो दिलासा, एक झंकार गात्रात गातो
लोचनाआड जातेस जेव्हा, पापणीला तुझा रंग येतो ... १।

माळवैराण निश्वासताना, रानपक्षी असा गात होता
काळरात्रीस ही सोबतीला, रातराणी तुझा गंध होता
काल निश्वासलेला तराणा, आज विश्वास देऊन जातो
लोचनाआड जातेस जेव्हा, पापणीला तुझा रंग येतो ... २।

मोरपंखी खुणेसारखी तू, चित्त मोहून घेतो फुलोर
अभ्र दाटून आले तरीही, तू ढगामागची चंद्रकोर
चांदण्याचा झुला हालताना, जीव भोळा शहारून जातो
लोचनाआड जातेस जेव्हा, पापणीला तुझा रंग येतो ... ३।

film: singer: Hridaynath Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ पाऊस कधीचा पडतो ॥

गायक: हृदयनाथ मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: ग्रेस

पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने
हलकेच जाग मज आली, दुःखाच्या मंद स्वराने ... धृ।

पेटून कशी उजळेना, ही शुभ्र फुलांची ज्वाळा
तार्यांच्या प्रहरापाशी, पाऊस असा कोसळला ... १।

संदिग्ध घरांच्या ओळी, आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनार्यांवरती, लाटांचा आज पहारा ... ३।

film: singer: Shridhar Phadke
lyrics: music: Shridhar Phadke

॥ फिटे अंधाराचे जाळे ॥

गायक: श्रीधर फडके
संगीत: श्रीधर फडके

फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश
दरीखोर्यातून वाहे एक प्रकाश प्रकाश ... धृ।

रान जागे झाले सारे पायवाटा जाग्या झाल्या
सूर्य जन्मता डोंगरी संगे जागल्या सावल्या
एक अनोखे लावण्य आले भरास भरास ... १।

दव पिवून नवेली झाली गवताची पाती
गाणी जुनीच नव्याने आली पाखरांच्या ओठी
क्षणापूर्वीचे पालटे जग उदास उदास ... २।

झाला आजचा प्रकाश जुना कालचा काळोख
चांदण्याला किरणांचा सोनसळी अभिषेक
सारे रोजचे तरीही नवा सुवास सुवास ... ३।

film: singer: Vasantrao Deshpande, Anuradha Paudwal
lyrics: music: Arun Paudwal

॥ प्रथम तुला वंदितो ॥

को. वल्हव रे नाखवा हो वल्हव रे रामा

हे. मी डोलकर डोलकर डोलकर दर्याचा राजा
घर पान्यावरी बंदराला करतो ये जा ... धृ।

ल. आईबापाची लाडाची लेक मी लारी
चोली पिवली गो नेसलेय अंजिरी सारी
माझ्या केसानं गो मालिला फुलैला चाफा
वास परमालता वार्यानं घेतंय झेपा
नथ नाकानं साजिरवानी गला भरून सोन्याचे मनी
कोलीवार्याची मी गो रानी
रात पुनवेला नाचून करतय मौजा ... १।

ल. या गो दरियाचा दरियाचा दरियाचा दरारा मोठा

कवा पान्यावरी उठताना डोंगर लाटा लाटा लाटा लाटा
हे. या गो दरियाचा दरियाचा दरियाचा दरारा मोठा
कवा पान्यावरी उठतान डोंगर लाटा लाटा लाटा लाटा
ल. कवा उधान वारा शीराला येतंय फारू
कवा पान्यातुनी आभाला भिरतंय तारू
वाट बघून झुरते पिरती मंग दरियाला येतंय भरती
जाते पान्यानं भिजून धरती
येतंय भेटाया तसाच भरतार माझा ... २।

हे. भल्या सकाल्ला आभाल झुकतंय हे खाली
सोनं चमचमतंय दरियाला चर्हतेय लाली
आमी पान्यामंदी रातंन टाकतोय जाली
अन दरियाचा लुटून भरतो डाली

रात पुनवेचं चांदनं ल्याली कशी चांदीची मासोली झाली
माझ्या जाल्यात होऊन आली
नेतो बाजारा भरून म्हावरा ताजा ... ३।

ITRANS Song Book: 69.s

film: singer: Jitendra Abhisheki lyrics: music:

॥ नाचत ना गगनात नाथा ॥

गायक: जितेंद्र अभिषेकी

नाचत ना गगनात नाथा, तारांची बरसात नाथा ... धृ।
आणित होती माणिक मोती, वरतुनी राजसरात नाथा ... १
नाव उलटली, भाव हरपली, चंदेरी दरियात नाथा ... २
तीही वरची देवाघरची, दौलत लोक पहात नाथा ... ३

ITRANS Song Book: 70.s

film: singer: Hridaynath Mangeshkar lyrics: music:

॥ नको देवराया ॥

गायक: हृदयनाथ मंगेशकर

नको देवराया अंत आता पाहू
प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ... धृ।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले
मजलागी जाहले तैसे देवा ... १।
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी
धावे हो जननी विठाबाई ... २।
मोकलुनि आस जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात ... ३।

ITRANS Song Book: 71.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ नीज माझ्या नंदलाला ॥

गायिका: लता मंगेशकर

नीज माझ्या नंदलाला नंदलाला रे
शांत हे आभाळ सारे शांत तारे शांत वारे
ह्या झर्याचा सूर आता मंद झाला मंद झाला रे ... धृ।
झोपल्या गोठ्यात गाई साद वा पडसाद नाही
पाखरांचा गलबलाही बंद झाला बंद झाला रे ... १।

ITRANS Song Book: 72.s

film: singer: lyrics: music: Yeshvant Dev

॥ पापणीला तुझा रंग येतो ॥

मी तुला जागे करावे तू मला बिलगून जावे ... ३।

ITRANS Song Book: 65.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ मालवून टाक दीप ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: सुरेश भट

मालवून टाक दीप चेतवून अंग अंग
राजसा किती दिसात लाभला निवांत संग ... धृ।
त्या तिथे फुलाफुलात पेंगते अजून रात
हाय तू करू नकोस एवढ्यात स्वप्नभंग ... १।
गार गार या हवेत घेवुनी मला कवेत
मोकळे करून टाक एकवार अंतरंग ... २।
दूर दूर तारकांत बैसली पहाट न्हात
सावकाश घे टिपून एक एक रूपरंग ... ३।
हे तुला कसे कळेल कोण एकटे जळेल
सांग का कधी खरेच एकटा जळे पतंग ... ४।
काय हा तुझाच श्वास दर्वळे इथे सुवास
बोल रे हळू उठेल चांदण्यावरी तरंग ... ५।

ITRANS Song Book: 66.s

film: singer: Shridhar Phadke
lyrics: music: Shridhar Phadke

॥ मन मनास उमगत नाही ॥

गायक: श्रीधर फडके
संगीत: श्रीधर फडके

मन मनास उमगत नाही आधार कसा शोधावा
स्वप्नातिल पदर धुक्याचा हातास कसा लागावा ... धृ।
मन थेंबांचे आकाश लाटांनी सावरलेले
मन नक्षत्रांचे रान अवकाशी अवघडलेले
मन गरगरते आवर्त मन रानभूल मन चकवा ... १।

मन काळोखाची गुंफा मन तेजाचे राऊळ
मन सैतानाचा हात मन देवाचे पाऊल
दुबळ्या गळक्या झोळीत हा सूर्य कसा झेलावा ... २।

चेहरामोहरा याचा कुणी कधी पाहिला नाही
धनी अस्तित्वाचा तरीही त्याच्यावीण दुसरा नाही
या अनोळखी नात्याचा कुणी कसा भरवसा द्यावा ... ३।

ITRANS Song Book: 67.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ मेंदीच्या पानावर ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: सुरेश भट

मेंदीच्या पानावर मन अजून झुलते ग
जाईच्या पाकळ्यांत दव अजून सलते ग ... धृ।

झुळझुळतो अंगणात तोच गार वारा ग
हुळहुळतो तुळशीचा अजून देह सारा ग ... १।

अजून तुझे हळदीचे अंग अंग पिवळे ग
अजून तुझ्या डोळ्यातील मोठेपण कवळे ग ... २।

ITRANS Song Book: 68.s

film: singer: Hemant Kumar, Lata Mangeshkar
lyrics: music:

॥ मी डोलकर ॥

गायक: हेमंत कुमार (हे.),
लता मंगेशकर (ल.),
आणि कोरस (को.)
गीत: शांता शेळके, संगीत: हृदयनाथ मंगेशकर

डोळ्यास पापण्यांचा का सांग भार व्हावा
मिटताच पापण्यांनी हा चंद्रही दिसावा
हे प्रश्न जीवघेणे हरती जिथे शहाणे ... १।

हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे
हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे
तिरपा कटाक्ष भोळा आम्ही इथे दिवाणे ... २।

जाता समोरुनी तू उगवे टपोर तारा
देशातुनी फुलांच्या आणी सुगंध वारा
रात्रीस चांदण्याचे सजते सुरेल गाणे ... ३।

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ लटपट लटपट ॥

गायिका: लता मंगेशकर
गीत: होनाजी बाळा
चित्रपट: होनाजी बाळा

लटपट लटपट, लटपट लटपट तुझं चालणं गं मोठ्या नखर्याचं
चालणं गं मोठ्या नखर्याचं, बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारी गं, नारी गं, नारी गं, हो नारी गं, हो नारी गं ... धृ।
कांती नवनवतीची ...
कांती नवनवतीची, दिसे चंद्राची प्रभा ढवळी
जाईची रं वेल कवळी
दिसणार सुकुमार नरम गाल व्हटं पवळी
जशी चवळीची शेंग कवळी
दिसणार सुकुमार नरम गाल व्हटं पवळी
तारुणपण अंगात झोक मदनाचा जोरात ... १
रुपसुरतीचा डौल ...
रुपसुरतीचा डौल, तेज अनमोल, सगुण गहिना
जशी का पिंजर्यातिल मैना
हिच्यासाठी कित्येकांची जनलोकात झाली दैना
अशी ही चंचल मृगनयना
हिच्यासाठी कित्येकांची जनलोकात झाली दैना
निर्मल कोमल तेज विजेचं तुटक्या तार्याचं ... २

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ मागे उभा मंगेश ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट: महानंदा

मागे उभा मंगेश
पुढे उभा मंगेश
माझ्याकडे देव माझा पाहतो आहे ... धृ।

जटाजूट माथ्यावरी
चंद्रकला शिरी धरी
चिताभस्म सर्वाङ्गास लिंपून राहे ... १।

जन्मजन्मांचा हा योगी
संसारी आनंद भोगी
विरागी की म्हणू भोगी
शैलसुतासंगे गंगा मस्तकी वाहे ... २।

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ मलमली तारुण्य माझे ॥

गायिका: आशा भोसले
गीत: सुरेश भट

मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे
मोकळ्या केसांत माझ्या तू जीवाला गुंतवावे ... धृ।

लागुनी थंडी गुलाबी शिरशिरी यावी अशी
राजसा माझ्यात तू अन् मी तुझ्यामाजी भिनावे ... १।

तापल्या माझ्या तनूची तार झंकारून जावी
रेशमी संगीत स्पर्शाचे पुन्हा तू पेटवावे ... २।

रे तुला बाहूंत माझ्या रूपगंधा जाग यावी

क्रोध अभिमान गेला पावतळी
एकएका लागतील पायी रे... धृ।

गोपीचंदनउटी तुळशीच्या माळा
हार मिरविती गळा
टाळ मृदंग खाई पुष्पवर्षाव
अनुपम्य सुखसोहळा रे... १।

वर्ण अभिमान विसरली याती
एकएका लोटांगणी जाती
निर्मळ चित्ते झाली नवनीते
पाषाणा पाझर फुटती रे... २।

होतो जयजयकार गर्जत अंबर
मातले वैष्णववीर रे
तुका म्हणे सोपी केली पायवाट
उतरावया भवसागर रे... ३।

ITRANS Song Book: 59.s

film: singer: Ravindra Sathe lyrics: music:

॥ कुणाच्या खांद्यावर ॥

गायक : रवींद्र साठे
चित्रपट: सामना
संगीत : भास्कर चंदावरकर
बोल : आरती प्रभू

कुणाच्या खांद्यावर
कुणाचे ओझे
कुणाचे ओझे...

कशासाठी उतरावे
तंबू ठोकून
कोण मेले कुणासाठी
रक्त ओकून
जगतात येथे कोणी
मनात कुजून
तरी कसे फुलतात
गुलाब हे ताजे...

दीप सारे जाती येथे
विरून विझून
वृक्ष जाती अंधारात
गोठून झडून
जीवनाशी घेती पैजा
घोकून घोकून
म्हणती हे वेडे पीर
तरी आम्ही राजे...

ITRANS Song Book: 60.s

film: singer: lyrics: Kavi Bhushan music:

॥ कुंद कहाँ पयवृंद कहाँ ॥

गायिका: लता मंगेशकर
गीत: कवी भूषण

कुंद कहाँ पयवृंद कहाँ
अरुचंद्र कहाँ सरजाजस जागे
भूषण भानू कृसनु कहाँ
उमर प्रताप ही कलपागे... धृ।

राम कहाँ, द्विजराम कहाँ
बलराम कहाँ, रण में अनुरागे... १।

बाज़ कहाँ, मृगराज कहाँ
अतिसाहस में सिवराज के आगे... २।

ITRANS Song Book: 61.s

film: singer: Hridaynath Mangeshkar lyrics: music:

॥ लाजून हासणे अन् हासून ते पहाणे ॥

गायक: हृदयनाथ मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर

लाजून हासणे अन् हासून ते पहाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे... धृ।

त्याचा कोष किनार्यास कधी लाभणार नाही ... ३।

तुझ्या कृपा कटाक्षाने झालो वणव्याचा धनी

त्याच्या निखार्यात कधी तुला जाळणार नाही ... ४।

ITRANS Song Book: 55.s

film: singer: Jitendra Abhiskeki lyrics: music:

॥ कैवल्याच्या चांदण्याला ॥

गायक: जितेंद्र अभिषेकी
राग: भैरवी

कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर
चंद्र व्हा हो पांडुरंगा, मन करा थोर ... धृ।
जन्म मरण नको आता, नको येरझार
नको ऐहिकाचा नाथा व्यर्थ बडिवार ... १
बालवयी खेळी रमलो, तारुण्य नासले
वृद्धपणी देवा आता दिसे पैलतीर ... २
इडापिडा पार न्या हो, जाहला उशीर
पांडुरंग, पांडुरंग ...
पांडुरंग, पांडुरंग, मन करा थोर ... ३

ITRANS Song Book: 56.s

॥ कानडा राजा पंढरीचा ॥

कानडा राजा पंढरीचा
वेदांनाही नाही कळला अंत पार याचा ... धृ।

हा नाम्याची खीर चाखतो
चोखोबाची गुरे राखतो
पुरंदराचा हा परमात्मा
वाणी दामाजीचा ... १।

निराकार तो निर्गुण ईश्वर
कसा प्रकटला असा विटेवर
उभय ठेविले हात कटीवर
पुतळा चैतन्याचा ... २।

परब्रह्म हे भक्तासाठी
उभे ठाकले भीमेकाठी
उभा राहिला भाव सावयव
स्वरुपी पुंडलिकाचा ... ३।

ITRANS Song Book: 57.s

film: singer: P L Deshpande lyrics: music:

॥ बाई या पावसानं ॥

गायक: पु। ल। देशपांडे

बाई या पावसानं लाविली रिमझिम
भिजविलं माळरान उदासलं मन
बाई या पावसानं ... धृ।

दिनभर देई ठाण रात्रीचं बरसून
सकाळचं लोपविलं कोवळं ऊन छान ... १।

फुलली ही जाई जुई बहरुनी वाया जाई
पारिजातकाची बाई कशी केली दैन ... मातीत पखरण २।

नदीनाले एक झाले ऊर भरोनिया चाले
जिवलग कोठे बाई पडे अडकून ... नच पडे चैन ... ३।

ITRANS Song Book: 58.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ खेळ मांडियेला ॥

गायिका: लता मंगेशकर
अभंग: संत तुकाराम

खेळ मांडियेला वाळवंटी ठायी
नाचती वैष्णव भाई रे

गायिका: लता मंगेशकर

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पहाते
वाट पहाते... धृ।

डोंगर-दरीचे सोडून घरटे
पल्लव-पाचूंचे तोडून नाते
हर्षाचा जल्लोष करुनी जेथे
प्रीत नदीची एकरूपते... १।

वेचीत वाळूत शंख-शिंपले
रम्य बाल्य ते जिथे खेळले
खेळाचा उल्हास रंगात येवुनी
धुंदीत यौवन जिथे डोलते... २।

बघुनी नभीची चंद्रकोर ती
सागर हृदयी उर्मी उठती
सुखदुःखाचे जिथे सारखे
प्रीत जीवना ओढ लावते... ३।

film: singer: Bakul Pandir lyrics: music:

॥ का धरिला परदेस ॥

गायिका: बकुळ पंडित

सजणा का धरिला परदेस... धृ।
श्रावण वैरी बरसे झिरमिर
चैन पडेना जीवा क्षणभर
जाऊ कोठे राहु कैसी घेऊ जोगिणवेष... १।
रंग न उरला गाली ओठी
भरती आसू काजळकाठी
शृंगाराचा साज उतरला मुक्त विखुरले केष... २

film: singer: Sudhir Phadke lyrics: music: Sudhir Phadke

॥ कधी बहर कधी शिशिर ॥

गायक: सुधीर फडके
संगीत: सुधीर फडके

कधी बहर कधी शिशिर
परंतु दोन्ही एक बहाणे
डोळ्यामधले आसू पुसती
ओठावरले गाणे... धृ।

बहर धुंद वेलीवर यावा
हळुच लाजरा पक्षी गावा
आणि अचानक गळुन पडावी
विखरून सगळी पाने... १।

हळुच फुलांच्या बिलगुन गाली
नाजुक गाणी कुणी गाईली
आता उरले आर्त विराणे
सूरच केविलवाणे... २।

film: singer: Shridhar Phadke lyrics: music: Yeshvant Dev

॥ काही बोलायाचे आहे पण बोलणार नाही ॥

गायक: श्रीधर फडके
संगीत: यशवंत देव

काही बोलायाचे आहे पण बोलणार नाही
देवळाच्या दारांमध्ये भक्ती तोलणार नाही... धृ।

माझ्या अंतरात गंध कल्प-कुसुमांचा दाटे
पण पाकळी तयाची कधी फुलणार नाही... १।

मेघ जांभळा एकला राहे नभाच्या कडेला
त्याचे रहस्य कोणाला कधी कळणार नाही... २।

दूर बंदरात उभे एक गलबत रुपेरी

॥ जाशील कोठे मुली तू ॥

गायक: रवींद्र साठे (र॥), आशा भोसले (आ॥)

र.- जाशील कोठे मुली तू
उ.- नेशील जेथे मुला तू... धृ।
र.- नेऊ कुठे मी तुला सुंदरी
उ.- स्वप्नात ने यक्षभूमीवरी
र.- स्वप्न कोठे वसे त्यात जावे कसे
उ.- हात हाती धरी संगती चाल तू... १।
र.- प्रीतीचा प्रांत का अजुनि ना लागला
उ.- रंग जाति पहा चुंबताना फुला
र.- वृक्ष आणि लता बोलती बिलगता
उ.- पाहुनी घे गडे प्रीतीची वेस तू... २।
र.- आनंद लाभे मना लोचना
उ.- प्रीतीमुळे ही फुले भावना
र.- ही कथा राहिली प्रीत ना पाहिली
उ.- पांघरू पाहसी व्यर्थ का वेड तू... ३।

film: Svatantravir Savarkar singer: Lata Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ जयोऽस्तु ते ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गीत: स्वातंत्र्यवीर सावरकर

जयोऽस्तु ते! जयोऽस्तु ते!
श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवती त्वामहम् यशोयुतां वंदे!

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती तूच जी विलसतसे लाली
तू सूर्याचे तेज उदधीचे गांभीर्यही तूची
स्वतंत्रते भगवती चांदणी चमचम लखलखशी
वंदे त्वामहम् यशोयुतां वंदे!

मोक्ष-मुक्ती ही तुझीच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती योगिजन परब्रह्म वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते
स्वतंत्रते भगवती सर्व तव सहचारी होते
वंदे त्वामहम यशोयुतां वंदे!

हे अधम रक्त-रंजिते सुजन पूजिते
श्री स्वतंत्रते... श्री स्वतंत्रते... श्री स्वतंत्रते...
तुजसाठी मरण ते जनन तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण
श्री स्वतंत्रते... श्री स्वतंत्रते... श्री स्वतंत्रते...

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ जेव्हा तिची नि माझी ॥

गायक: अरुण दाते

जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली
झाली फुले कळ्यांची झाडे घरात आली... धृ।

दूरातल्या दिव्यांचे मणिहार मांडलेले
पाण्यात चांदण्यांचे आभाळ सांडलेले
कैफात काजव्यांची अन् पालखी निघाली... १।

केसातल्या जुईचा तिमिरास गंध होता
श्वासातल्या लयीचा आवेग अंध होता
वेड्या समर्पणाची वेडी मिठी मिळाली... २।

नव्हतेच शब्द तेव्हा मौनात अर्थ सारे
स्पर्शात चंद्र होता स्पर्शात लाख तारे
ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली... ३।

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ जिथे सागरा ॥

॥ जग हे बंदीशाला ॥

गायक: सुधीर फडके
चित्रपट: जगाच्या पाठीवर

जग हे बंदीशाला
कुणी न येथे भला चांगला
जो तो पथ चुकलेला... धृ।

ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडीतले सखे-सौंगडी
हातकडी की अवजड बेडी
प्रिय हो ज्याची त्याला... १।

जो तो अपुल्या जागी जखडे
नजर न धावे तटापलिकडे
उंबरातले किडे-मकोडे
उंबरी करिती लीला... २।

कुणा न माहित सजा किती ते
कोठुन आले ते नच स्मरते
सुटकेलाहि मन घाबरते
जो आला तो रमला... ३।

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ जन विजन झाले आम्हा ॥

गायक: रामदास कामत
अभंग: संत तुकाराम

जन विजन झाले आम्हा
विठ्ठल नामा प्रमाणे... धृ।

पाहे तिकडे मायबाप
विठ्ठल आहे रखुमाई... १।

वनपट्टण एक भाव
अवघा ठाव सरता झाला... २।

आठव नाही सुखदुःखा
नाचे तुका कौतुके... ३।

film: singer: Lata Mangeshkar lyrics: B R Tambe music:

॥ जन पळभर ॥

गायिका: लता मंगेशकर
गीत: भा। रा। तांबे

जन पळभर म्हणतील हाय हाय
मी जाता राहिल कार्य काय... धृ।

सूर्य तळपतील चंद्र झळकतील
तारे अपुला क्रम आचरतील
असेच वारे पुढे वाहतील
होईल काही का अंतराय... १।

मेघ वर्षतील शेते पिकतील
गर्वाने ह्या नद्या वाहतील
कुणा काळजी की ना उमटतील
पुन्हा तटावर तेच पाय... २।

सगेसोयरे डोळे पुसतील
पुन्हा आपुल्या कामी लागतील
उठतील बसतील हसुनि खिदळतील
मी जाता त्यांचे काय जाय... ३।

अशा जगास्तव काय कुढावे
मोहि कुणाच्या का गुंतावे
हरिदूता का विन्मुख व्हावे
का जिरवु नये मातीत काय... ४।

film: singer: Ravindra Sathe, Asha Bhonsle lyrics: music:

ITRANS Song Book: 40.s

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ हरि ओम् हरि ओम् ॥

गायक: रामदास कामत

हरि ओम् हरि ओम् हरि ओम् प्रणव ओंकार शिवा
हृदयात उजळु दे सूर्यदिवा ... धृ।
वर चक्र उलगडे तानांचे, हे बोल खोल मम प्राणांचे
प्रतिभेचा हुंकार नवा ... १।
तिमिरातच होते गगनप्रभा, ज्योतिर्मय त्यातुनि दिव्यसभा
विलसु दे रुपेरी चंद्रकपा ... २।

ITRANS Song Book: 41.s

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ हे आदिमा हे अंतिमा ॥

गायक: रामदास कामत

हे आदिमा हे अंतिमा
जे वांछिले ते तू दिले, कल्पद्रुमा ... धृ।
या मातिचे आकाश तू, शिशिरात या मधुमास तू
देसी मृता तू अमृता, पुरुषोत्तमा ... १
देणे तुझे इतुके शिरी, झालो ऋणी जन्मांतरी
अपकार मी, अपराध मी, परि तू क्षमा ... २

ITRANS Song Book: 42.s

film: singer: Jayavant Kulkarni lyrics: music:

॥ ही चाल तुरुतुरु ॥

गायक: जयवंत कुलकर्णी

ही चाल तुरुतुरु उडती केस भुरुभुरु डाव्या डोळ्यावर बट ढळली
जशी मावळत्या उन्हात केवड्याच्या बनात नागीण सळसळली ... धृ।
इथे कुणी आसपास ना डोळ्यांच्या कोनात हास ना
तू जरा माझ्याशी बोल ना ओठांची मोहोर खोल ना
तू लगबग जाता मागे वळून पहाता वाट पावलात अडखळली ... १।
उगाच भुवई ताणून उगाचा रुसवा आणून
पदर चाचपुन हातानं ओठ जरा दाबीशी दातानं
हा राग जीवघेणा खोटा खोटा तो बहाणा आता माझी मला खूण कळली

ITRANS Song Book: 43.s

॥ हिरव्या हिरव्या रंगाची ॥

हिरव्या हिरव्या रंगाची झाडी घनदाट
सांग गो चडवा दिसतां कसो खंडाळ्याचो घाट ... धृ।
हिरव्या हिरव्या झाडीत हिरवी हिरवी पानं
हिरव्या हिरव्या पानांत वारा गातो गाणं
पूना-बाँबे हीच गो तुझ्या सासरची वाट ... १।
खंडाळ्याच्या घाटात हवा थंडगार
थंडीमधे लाली चढे गाली गुलजार
तोर्यामधे होऊ नको उगी अशी ताठ ... २।
बोगद्यात गाडी जाता होई अंधार
अंधारात प्रीत घेता प्रीतीचो आधार
इंजिनाच्या मागे जाती डबे मागोमाग ... ३।

ITRANS Song Book: 44.s

॥ हृदयी जागा तू अनुरागा ॥

हृदयी जागा तू अनुरागा, प्रीतीला या देशिल का ... देशिल का ... धृ।
बांधिन तेथे घरकुल चिमणे, स्वर्गाचे ते रूप ठेंगणे
शृंगाराचे कोरीव लेणे, रहावयाला येशिल का ... येशिल का ... १
दोन मनांची उघडी दारे, आत खेळते वसंत वारे
दीप लोचनी सदैव तू रे, संध्यासारस होशिल का ... होशिल का ... २
घराभोवती निर्झर नाचे, जाणुन अपुल्या गूढ मनाचे
झाकुन डोळे एकांताचे, जवळी मजला घेशिल का ... घेशिल का ... ३

ITRANS Song Book: 45.s

film: Jagyacha Pathivar singer: Sudhir Phadke
lyrics: music:

दध्योदन भक्षी . . . २ ।

ITRANS Song Book: 37.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: B R Tambe music:

॥ घनतमी शुक्र बघ राज्य करी ॥

गायिका: लता मंगेशकर
गीत: भा । रा । तांबे

घनतमी शुक्र बघ राज्य करी
रे खिन्न मना बघ जरा तरी . . . धृ ।
ये बाहेरी अंडी फोडुनि, शुद्ध मोकळ्या वातावरणी
का गुदमरसी आतच बुडुनी, रे मार भरारी जरा वरी . . . १
फूल गळे फळ गोड जाहले, बीज नुरे डौलात तरू डुले
तेल जळे बघ ज्योत पाजळे, का मरणि अमरता ही न खरी . . . २
मना वृथा का भीसी मरणा, दार सुखाचे ते हरिकरुणा
आई पाही वाट रे मना, पसरूनि बाहु कवळण्या उरी . . . ३

ITRANS Song Book: 38.s

film: Haa Khel Saavalyancha singer: Hemant Kumar, Asha Bhonsle
lyrics: music:

॥ गोमू संगतीनं ॥

गायक: हेमंत कुमार (हे.), आशा भोसले (आ.)
चित्रपट: हा खेळ सावल्यांचा
हे.
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय?
माझ्या पिरतीची राणी तू होशील काय?
आ.
अरं संगतीनं तुझ्या मी येणार नाय
तुझ्या पिरतीची राणी मी होणार नाय . . . धृ ।

हे.
ग तुझं टपोरं डोळं जसं कोळ्याचं जाळं
माझं काळीज भोळं त्यात मासोळी झालं
माझ्या प्रीतीचा सुटलाय तुफान वारा वारा वारा
आ.
रं नगं दावूस भलताच तोरा, जा रं गुमान साळसूद चोरा
तुझ्या नजरेच्या धाकाला अशी मी भुलणार नाय . . . १ ।

आ.
रं माझ्या रूपाचा ऐना तुझ्या जीवाची दैना
मी ग रानाची मैना तुझा शिकारी बाणा
खुळा पारधी ग जाळ्यामंदी आला आला आला
हे.
ग तुला रूप्याची नथ मी घालीन, ग तुला मिरवत मिरवत नेईन
आ.
तुझ्या फसव्या या जाळ्याला अशी मी गावणार नाय . . . २ ।

हे.
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय?
माझ्या पिरतीची राणी तू होशील काय?
आ.
अरं संगतीनं तुझ्या मी येणार हाय
तुझ्या पिरतीची राणी मी होणार हाय

ITRANS Song Book: 39.s

film: Haa Khel Savalyancha singer: Mahendra Kapoor
lyrics: music:

॥ हा खेळ सावल्यांचा ॥

गायक: महेंद्र कपूर
चित्रपट: हा खेळ सावल्यांचा

रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्याचा
संपेल ना कधीही हा खेळ सावल्यांचा . . . धृ ।

हा चंद्र ना स्वयंभू रवितेज वाहतो हा
ग्रहणात सावल्यांचा अभिशाप भोगतो हा
प्रीतीस होय साक्षी हा दूत चांदण्याचा . . . १ ।

आभास सावली हा असतो खरा प्रकाश
जे सत्य भासती ते असती नितांत भास
फसतात सावलीला हा दोष आंधळ्यांचा . . . २ ।

या साजिर्‍या क्षणाला का आसवे पिठीत
मिटतील सर्व शंका उबदार या मिठीत
गवसेल सूर अपुल्या या धुंद जीवनाचा . . . ३ ।

वेगवेगळी फुले उमलली रचुनी त्यांचे झेले
एकमेकांवरी उधळले गेले ते दिन गेले... धृ।

कदंबतरूला बांधुन झोला, उंच खालती झोले
तू मी मिळुनी रोज घेतले, गेले ते दिन गेले... १।

हरित बिलोरी वेलबुटीवरी शीत रसांचे प्याले
अन्योन्यांनी किती झोकले, गेले ते दिन गेले... २।

ITRANS Song Book: 34.s

॥ घनघनमाला नभी दाटल्या ॥

घनघनमाला नभी दाटल्या
कोसळती धारा
केकारव करी मोर काननी
उभवुन रम्य पिसारा... धृ।

कालिंदीच्या तटी श्रीहरी
तशात घुमवी धुंद बासरी
एक अनामिक सुगंध येतो
ओल्या अंधारा... १।

कृष्णविरहिणी कोणी गवळण
तिला अडविते कवाड अंगण
अंगणी अवघ्या तळे साचले
भिडले जलदाला... २।

ITRANS Song Book: 35.s

film: singer: Manik Varma lyrics: music:

॥ घननीळा लडिवाळा ॥

गायिका: माणिक वर्मा

घननीळा लडिवाळा, झुलवु नको हिंदोळा
रे झुलवु नको हिंदोळा... धृ।

सुटली वेणी केश मोकळे
धूळ उडाली भरले डोळे
काजळ गाली सहज ओघळे
या सार्यांचा उद्या गोकुळी होइल अर्थ निराळा... १।

सांजवेळ ही आपण दोघे
अवघे संशय घेण्याजोगे
चंद्र दिसे बघ झाडामागे
कालिंदीच्या तटी खेळतो गोपसुतांचा मेळा... २।

ITRANS Song Book: 36.s

film: Amar Bhopali singer: Panditrao Nagarkar, Lata Mangeshkar
lyrics: Honaaji Bala music:

॥ घनश्याम सुंदरा ॥

गायक: पंडितराव नगरकर, लता मंगेशकर
गीत: होनाजी बाळा
चित्रपट: अमर भूपाळी

घनश्याम सुंदरा श्रीधरा
अरुणोदय झाला
उठी लवकरी वनमाळी उदयाचली मित्र आला
घनश्याम सुंदरा... धृ।

आनंदकंदा प्रभात झाली
उठी सरली राती
काढी धार क्षीरपात्र घेवुनी
धेनू हंबरती
लक्षिताती वासुरे हरी
धेनू स्तनपानाला... १।

सायंकाळी एके मेळी
द्विजगण अवघे वृक्षी
अरुणोदय होताच उडाले
चरावया पक्षी
प्रभातकाळी उठुनी कावडी
तीर्थपथलक्षी
करुनी सडा-संमार्जन गोपी
कुंभ घेऊनी कुक्षी
यमुना जळासी जाती मुकुंदा

उ. रेशिम विळखा घालुन सजणा नका हो कवळुन धरू
अ. का?
उ. लुकलुक डोळं कराया भोळं बघतंय फुलपाखरू
अ. कसा मिळावा पुन्हा साजणी मोका असला गं ... १।
उ. बेजार झाले सोडा सजणा शिरिशिरी आली अंगा
अ. का?
उ. मधाचा ठेवा लुटता लुटता बघतोय चावट भुंगा
अ. मनात राणी तुझ्या कशाचा झोका झुलला गं ... २

ITRANS Song Book: 31.s

film: Pinjara singer: Vishnu Vaghmare
lyrics: music: Ram Kadam

॥ गं साजनी ॥

गायक: विष्णू वाघमारे
संगीत: राम कदम
चित्रपट: पिंजरा

गं साजनी ...
कुन्या गावाची कंच्या नावाची कुन्या राजाची तू गं रानी ... गं
आली ठुमकत नार लचकत मान मुरडत हिरव्या रानी ... धृ।
खुळुखुळु घुंगराच्या तालावर झाली दंग
शालू बुट्टीदार लई लई झाला तंग
सोसंना भार घामाघूम झालं अंग
गोर्या रंगाची न्यार्या ढंगाची चोळी भिंगाची ऐन्यावानी ... गं ... १।
डाळिंबाचं दानं तुझ्या पिळलं गं व्हटावरी
गुलाबाचं फूल तुझ्या चुरडलं गालावरी
कबूतर येडंखुळं फिरतंया भिरिभिरी
तुझ्या नादानं झालो बेभान जीव हैरान येड्यावानी ... गं ... २
कवळ्यात घेवोनिया अलगद उचलावं
मऊ मऊ हिरवळीत दहिवरात भिजवावं
पिरतीचं बेनं तुझ्या काळजात रुजवावं
लाडीगोडीनं खुळ्या ओढीनं जाऊ जोडीनं राजारानी ... गं ... ३।

ITRANS Song Book: 32.s

film: Unbartha singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ गगन सदन तेजोमय ॥

गायिका: लता मंगेशकर
चित्रपट: उंबरठा

गगन सदन तेजोमय
तिमिर हरुन करुणाकर
दे प्रकाश देई अभय ... धृ।

छाया तव माया तव
हेच परम पुण्य धाम
वार्यातुन तार्यातुन
वाचले तुझेच नाव
जगजीवन जनन मरण
हे तुझेच रूप सदय ... १।

वासंतिक कुसुमांतुन
तूच मधुर हासतोस
मेघांच्या धारांतुन
प्रेमरूप भासतोस
कधि येशिल चपलचरण
वाहिले तुलाच हृदय ... २।

भवमोचन हे लोचन
तुजसाठी दोन दिवे
कंठातिल स्वर मंजुळ
भावमधुर गीत नवे
सकलशरण मनमोहन
सृजन तूच तूच विनय ... ३।

ITRANS Song Book: 33.s

film: singer: Hridaynath Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ गेले ते दिन गेले ॥

गायक: हृदयनाथ मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर

दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे ... धृ।
बकुळीच्या झाडाखाली निळ्या चांदण्यात
हृदयाची ओळख पटली सुगंधी क्षणात
त्या सगळ्या बकुळफुलांची ...
त्या सगळ्या बकुळफुलांची शपथ तुला आहे ... १
शुभ्र फुले वेचित रचिला चांद तू जुईचा
म्हणालीस चंद्रोत्सव हा सावळ्या भुईचा
फुलातल्या त्या चंद्राची ...
फुलातल्या त्या चंद्राची शपथ तुला आहे ... २
भुरभुरता पाऊस होता सोनिया उन्हात
गवतातुन चालत होतो मोहुनी मनात
चुकलेल्या त्या वाटेची ...
चुकलेल्या त्या वाटेची शपथ तुला आहे ... ३
हळूहळू काजळताना सांज ही सुरंगी
तुझे भास दाटुनि येती असे अंतरंगी
या उदास आभाळाची ...
या उदास आभाळाची शपथ तुला आहे ... ४

ITRANS Song Book: 28.s

film: Pinjara singer: lyrics: music: Ram Kadam

॥ दिसला गं बाई दिसला ॥

चित्रपट: पिंजरा
संगीत: राम कदम

ज्वानीची घेऊन मशाल हाती
आले मी अवसेच्या भयाण राती
काजवा उडं, किरकिर किडं रानात सुरात गाती
दिलाचा दिलवर जिवाचा जिवलग
कुठं दिसंना मला
इथं दिसंना ... तिथं दिसंना
शोधू कुठं ... शोधू कुठं
दिसला गं बाई दिसला
मला बघून गालात हसला गं बाई हसला ... धृ।

गडी अंगानं उभा नि आडवा
त्याच्या रूपात गावरान गोडवा
तेजाळ मुखडा सोन्याचा तुकडा
काळजामधी घुसला
गं बाई बाई काळजामधी घुसला
काळजामधी ... काळजामधी ... काळजामधी ... १।

ITRANS Song Book: 29.s

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ दिवस तुझे हे फुलायचे ॥

गायक: अरुण दाते

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे ... धृ।

स्वप्नात गुंगत जाणे, वाटेत भेटते गाणे
गाण्यात हृदय झुलायचे ... १।

मोजावी नभाची खोली, घालावी शपथ ओली
श्वासांत चांदणे धरायचे ... २।

माझ्या या घराच्या पाशी, थांब तू गडे जराशी
पापण्या मिटून झुरायचे ... ३।

ITRANS Song Book: 30.s

film: singer: Arun Saranaaik, Usha Mangeshkar
lyrics: music:

॥ एक लाजरा न् साजरा मुखडा ॥

गायक: अरुण सरनाईक (अ.), उषा मंगेशकर (उ.)

अ. एक लाजरा न् साजरा मुखडा चंद्रावाणी फुलला गं
उ. राजा मदन हसतो कसा की जीव माझा भुलला गं
अ. या एकांताचा तुला इशारा कळला गं
उ. लाज आडवी येते मला की जीव माझा भुलला गं
अ. नको राणी नको लाजू लाजेमधी नको भिजू
उ. हितं नको तिथं जाऊ आडोश्याला उभं र्हाऊ
अ. का?
उ. बघत्यात ... धृ।

अवघ्याच जीवनाचे व्हावे सुरेल गाणे...

घेऊ कसा निरोप, तुटतात आर्त धागे
हा देह दूर जातो मन राहणार मागे
धन आत्मजा दुजाचे त्याचे तयास देणे
परक्यापरी असा मी येथे फिरून येणे...

ITRANS Song Book: 24.s

film: Aamhi jaato aamchya gava singer: Sudhir Phadke
lyrics: music:

॥ देहाची तिजोरी ॥

गायक : सुधीर फडके
चित्रपट: आम्ही जातो अमुच्या गावा

देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा
उघड दार देवा आता उघड दार देवा...

पिते दूध डोळे मिटुनी जात मांजराची
मनी चोरट्याच्या का रे भिती चांदण्याची
सरावल्या हातांनाही कंप का सुटावा...

उजेडात होते पुण्य अंधारात पाप
ज्याचे त्याचे हाती आहे कर्तव्याचे माप
दुष्ट दुर्जनांची कैसी घडे लोकसेवा...

स्वार्थ जणू भिंतीवरचा आरसा बिलोरी
आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी
घडोघडी अपराध्यांचा तोल सावरावा...

ITRANS Song Book: 25.s

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ देवा तुझा मी सोनार ॥

गायक: रामदास कामत
अभंग: नरहरी सोनार

देवा तुझा मी सोनार
तुझे नामाचा व्यवहार... धृ।

मन बुद्धीची कतरी
रामनाम सोने चोरी... १।

नरहरी सोनार हरीचा दास
भजन करी रात्रंदिवस... २

ITRANS Song Book: 26.s

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ धुके दाटलेले उदास उदास ॥

गायक: अरुण दाते

धुके दाटलेले उदास उदास
मला वेढिती हे तुझे सर्व भास... धृ।

उभी मूक झाडे विरागी किनारा
झुरे अंतरी अन् फिरे आर्त वारा
कुणीही न येथे दिसे आसपास... १।

कुठे चालल्या ह्या दिशाहीन वाटा
कुणा शोधिती ह्या उदासीन लाटा
दिशांतून दाटे तुझा एक ध्यास... २।

क्षणी भास होतो तुझे सूर येती
जिवा भारुनी हे कसे दूर नेती
स्मृती सोबतीला असा हा प्रवास... ३।

ITRANS Song Book: 27.s

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे ॥

गायक: अरुण दाते

लांबल्या सावल्या चालल्या सोडून ... ३।

ITRANS Song Book: 20.s

film: Unbaratha singer: Lata Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ चांद मातला मातला ॥

गायिका: लता मंगेशकर
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट: उंबरठा

चांद मातला मातला, त्याला कशी आवरू
अंगी वणवा पेटला, त्याला कशी सावरू ... धृ।

जशी पुनवेची निशा, चढे चांदण्याची नशा
गेल्या हरवुन दिशा, झाले खुळे पाखरू ... १।

आला समुद्रही रंगा, त्याचा धिटाईचा दंगा
वेड्या लहरींचा पिंगा बाई झाला की सुरू ... २।

गोड गारव्याचा वारा, देह थरारला सारा
चांद अमृताचा मनी बाई लगला धरू ... ३।

ITRANS Song Book: 21.s

film: singer: Asha Bhonsle
lyrics: music: Hridaynath Mangeshkar

॥ चांदण्यात फिरताना ॥

गायिका: आशा भोसले
संगीत: हृदयनाथ मंगेशकर

चांदण्यात फिरताना माझा धरलास हात
सखया रे आवर ही सावर ही चांदरात ... चांदरात ... धृ।
निजलेल्या गावातुन आले मी एकटीच
दूर दिवे कळलावे पडले मागे कधीच
ह्या इथल्या तरूछाया तण सारे जाळतात ... जाळतात ... १
सांग कशी तुजविनाच पार करू पुनवपूर
तुज वारा छळवादी अन् हे तारे फितूर
श्वास तुझा मालकंस स्पर्श तुझा पारिजात ... पारिजात ... २

ITRANS Song Book: 22.s

film: singer: Vasantrao Deshpande lyrics: music:

॥ छेडियल्या तारा ॥

गायक: वसंतराव देशपांडे

हो छेडियल्या तारा
हे गीत येईना जुळोनि
फुलते ना फूल तोच जाय पाकळी गळोनि ... धृ।
आकारुन येत काही विरते निमिषात तेही
स्वप्नचित्र पुसुनि जाई रंग रंग ओघळोनि ... १।
क्षितिजाच्या फार दूर मृगजळास येई पूर
लसलसते अंकुर हे येथ चालले जळोनि ... २।

ITRANS Song Book: 23.s

film: Ashtavinayak singer: Vasantrao Deshpande
lyrics: music: Arun Paudwal

॥ दाटून कंठ येतो ॥

गायक: वसंतराव देशपांडे
संगीत: अरुण पौडवाल
चित्रपट: अष्टविनायक

दाटून कंठ येतो, ओठात येई गाणे
जा आपुल्या घरी तू, जा लाडके सुखाने ...

हातात बाळपोथी, ओठात बाळभाषा
रमलो तुझ्या सवे मी गिरवीत श्रीगणेशा
वळवून अक्षरांना केले तुला शहाणे
जातो सुखावुनी मी त्या गोड आठवाने ...

बोलात बोबडीच्या संगीत जागवीले
लय ताल सूर लेणे सहजीच लेववीले
एकएक सूर यावा न्हावून अमृताने

हातासह सोन्याची सांज गुंफताना
बगळ्यांचे शुभ्र तळे मिळुनी मोजताना
कमलापरि मिटती दिवस उमलुनी तळ्यात ... ३।
तू गेलीस सोडुनि ती माळ सर्व धागे
फडफडणे पंखाचे शुभ्र उरे मागे
सलते ती तडफड का कधि तुझ्या उरात ... ४।

ITRANS Song Book: 17.s

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ बाई माझी करंगळी मोडली ॥

गायिका: लता मंगेशकर

ऐन दुपारी यमुना तीरी खोडी कशी काढली
बाई माझी करंगळी मोडली ...

जळी वाकुन मी घट भरताना
कुठुन अचानक आला कान्हा
गुपचुप येवुन पाठीमागुन
माझी वेणी ओढली ...

समोर थाटी उभा आडवा
हातच धरला माझा उजवा
मीही चिडले मीहि जकडले
वनमाला ???

ITRANS Song Book: 18.s

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ भेट तुझी माझी स्मरते ॥

गायक: अरुण दाते

भेट तुझी माझी स्मरते
भेट तुझी माझी स्मरते अजुन त्या दिसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची ... धृ।

कुठे दिवा नव्हता गगनी एकही न तारा
आंधळ्या तमातुन वाहे आंधळाच वारा
तुला मुळी नव्हती बाधा
तुला मुळी नव्हती बाधा भीतिच्या विषाची ... १।

क्षुद्र लौकिकाची खोटी झुगारून नीती
नावगाव टाकुन आली अशी तुझी प्रीती
तुला मुळी जाणिव नव्हती
तुला मुळी जाणिव नव्हती तुझ्या साहसाची ... २।

केस चिंब ओले होते थेंब तुझ्या गाली
ओठांवर माझ्या त्यांची किती फुले झाली
श्वासांनी ...
श्वासांनी लिहिली गाथा प्रीतिच्या रसाची ... ३।

सुगंधीच हळव्या शपथा सुगंधीच श्वास
स्वप्नातच स्वप्न दिसावे तसे सर्व भास
सुखालाही भोवळ आली ...
सुखालाही भोवळ आली मधुर सुवासाची ... ४।

ITRANS Song Book: 19.s

film: singer: lyrics: music: Yashvant Dev

॥ चालले जीवन ॥

संगीत: यशवंत देव

वाळवंटातून भीषण वैराण
चालले जीवन, चालले जीवन ... धृ।

वाळूचा सागर क्षितिज चौफेर
त्यावर लोळते जळते अंबर
रेतीस नाचवी वाफेचे तुफान ... १।

गेले रे, गेले रे, संगती सोबती
पुसट पाऊले ठेवून मागुती
कितीक जायाचे असेच अजून ... २।

कलला कलला, दिवस कलला,
उंटांच्या पायांनी काळ हा चालला

कुठे मी नाव ही नेवू...
नदीला पूर आलेला
कशी येवू कशी येवू...

जटा पिंजून ह्या लाटा
विखारी झेप ही घेती...
भिडे काळोख प्राणांना
दिशांचे भोवरे होती...
जीवाचे फूल हे माझ्या
तुझ्या पायी कशी ठेवू...

कुळाचे लौकिकाचे मी
क्षणी हे तोडिले धागे...
बुडाले गाव ते आता
बुडाली नाव ही मागे...
दिले हे दान दैवाने
करी माझ्या कशी घेवू...

जगाच्या क्रूर शापांचे
जीव्हावरी झेलले भाले...
तुझे सौभाग्य ल्याया हे
तुझी होऊन मी आले...
तुझे तू घे ऊरी आता
किती मी हाक ही देवू...

film: Gammat-Jammat singer: Kishore Kumar, Anuradha Paudwal lyrics: music:

॥ अश्विनी ये ना ॥

गायक: किशोर कुमार (कि।), अनुराधा पौडवाल (अ।)
चित्रपट: गम्मत-जम्मत
कि।
अश्विनी, ये ना... ये ना
प्रिये, जगू कसा तुझ्या विना मी राणी गं
कशी ही जिंदगीत आणीबाणी गं... तू ये ना प्रिये
मी तर प्रेमदिवाणा रसीला दे प्यार जरासा नशीला
अ।
प्रिया, उगाच संशयात मी बुडाले रे
तुला छळून मी जळून गेले रे... तू ये साजणा
विसर झाले गेले सख्या रे शरण आले राया तुला रे... धृ।

कि।
मंद धुंद ही गुलाबी हवा, प्रीत गंध हा शराबी नवा
अ।
हात हा तुझाच हाती हवा, झोंबतो तनूस हा गारवा
कि।
तुझी माझी प्रीत अशी फुले मधुराणी
अ।
फुलांतुनि उमलती कशी गोड गाणी
कि।
तू ये ना, तू ये ना
अ।
ना ना ना ना ना ना ना... १।

कि।
ये अशी मिठीत ये साजणी, पावसात प्रीतिच्या नावानी
अ।
स्वप्न धुंद जागले लोचनी, अंग अंग मोहरे लाजुनी
कि।
जाऊ नको दूर आता मन फुलवुनी
अ।
तूच माझा राजा अन् मीच तुझी राणी
कि।
तू ये ना, तू ये ना, तू ये ये ये ये ये ये... २।

film: singer: Vasantrao Deshpande lyrics: music:

॥ बगळ्यांची माळ फुले ॥

गायक: वसंतराव देशपांडे

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात
भेट आपुली स्मरशी काय तू मनात... धृ।
छेडिती पानात बीन थेंब पावसाचे
ओल्या रानात फुले ऊन अभ्रकाचे
मनकवडा घन घुमतो दूर डोंगरात... १।
त्या गाठी त्या गोष्टी नारळिच्या खाली
पौर्णिमाच तव नयनी भरदिवसा झाली
रिमझिमते अमृत हे विकल अंतरात... २।

film: singer: Arun Date lyrics: music:

॥ अखेरचे येतिल माझ्या ॥

गायक: अरुण दाते

अखेरचे येतिल माझ्या हेच शब्द ओठी
लाख चुका असतिल केल्या केली पण प्रीती ... धृ।

इथे सुरू होण्याआधी संपते कहाणी
साक्षीला केवळ उरते डोळ्यातिल पाणी ... डोळ्यातिल पाणी
जखम उरी होते ज्यांच्या तेच गीत गाती ... १।

सर्व बंध तोडुनि जेव्हा नदी धुंद धावे
मीलन का मरण पुढे हे तिला नसे ठावे ... तिला नसे ठावे
एकदाच आभाळाला अशी भिडे माती ... २।

गंध दूर ज्याचा आणिक जवळ मात्र काटे
असे फूल प्रीती म्हणजे कधी हाय वाटे ... कधी हाय वाटे
तरी गंध धुंडित धावे जीव तुझ्यासाठी ... ३।

आर्त गीत आले जर हे कधी तुझ्या कानी
गूज अंतरीचे कथिले तुला या स्वरांनी
डोळ्यांतुन माझ्यासाठी लाव दोन ज्योती ... ४।

film: Haa Khed Savalyanchaa singer: Asha Bhonsle, Anuradha Paudwal
lyrics: music:

॥ आला आला वारा ॥

गायिका: आशा भोसले, अनुराधा पौडवाल
चित्रपट: हा खेळ सावल्यांचा

आला आला वारा, संगे पावसाच्या धारा
पाठवणी करा सया निघाल्या सासुरा ... धृ।

नव्या नवतीचं बाई लकाकतं रूप
माखलं ग जुनं जणू हळदीचा लेप
ओठी हासू पापणीत आसवांचा झरा ... १।

आजवरी यांना किती जपलं जपलं
काळजाचं पाणी किती शिपलं शिपलं
चेतवून प्राण यांना दिला ग उबारा ... २।

येगळी माती आता ग येगळी दुनिया
आभाळाची माया काय करील किमया
फुलंल बाई पावसानं मुलुख ग सारा ... ३।

॥ आली आली हो गोंधळाला ॥

आली आली हो गोंधळाला गोंधळाला आली ... अहा
तुळजाभवानी माझी आई तुळजाभवानी आली
भक्ताच्या नवसाला पावली रं ... तुळजाभवानी आली ... धृ।

हाकेच्या तोंडाशी माझी साधी झोपडी ... अहा
बसाया नव्हती घरात फाटकी घोंगडी ... अहा
भवानी भुईवर बसली रं ... तुळजाभवानी आली ... १।

हातानं सोन्याचा दिवा आज मी लाविला ... अहा
निविद देविला भाजी भाकरीचा दिला ... अहा
भवानी भाकरी जेवली रं ... तुळजाभवानी आली ... २।

भवानी मी तुझा भक्त खरा
जिच्या मुखातुन वाहती या त्या ज्ञानरसाच्या झरा
कवड्याच्या माळा नि घालुनि गळा मागी जोगवा जरा
वेळेला धावुन आली रं ... तुळजाभवानी आली ... ३।

film: singer: Lata Mangeshkar
lyrics: music: Hridaynath Mangeshaker

॥ असा बेभान हा वारा ॥

संगीत: हृदयनाथ मंगेशकर
गायिका: लता मंगेशकर

असा बेभान हा वारा

निसटुनी जाय संधीचा क्षण
सदा असा संकोच नडे... ४।

॥ अजुनी रुसून आहे ॥

गायक: कुमार गंधर्व

अजुनी रुसून आहे खुलता कळी खुलेना
मिटलेच तेच ओठच पाकळी हलेना... धृ।

समजूत मी करावी म्हणुनीच तू रुसावे
हे हात सांगतात रडता तू हसावे
ते आज का नसावे समजावुनी पटेना
धरिला असा अबोला की बोल बोलवेना... १।

की गूढ काही डाव वरचा न हा तरंग
घेण्यास खोल ठाव बघण्यास अंतरंग
रुसवा असा कसा हा ज्या आपुले कळेना... २।

film: singer: Ramdas Kamat lyrics: music:

॥ आकाशी फुलला चांदण्याचा मळा ॥

गायक: रामदास कामत

आकाशी फुलला चांदण्याचा मळा
बाग तो आगळा चंद्रम्याचा... धृ।

घेवुनिया संगे लाटांचे संगीत
सागर नाचतो किनार्याशी... १।

सुगंध लेवून उभी जाईजुई
देवा ही पुण्याई तुझीच रे... २।

film: singer: Sudhir Phadke lyrics: music:

॥ आकाशी झेप घे रे पाखरा ॥

गायक: सुधीर फडके

आकाशी झेप घे रे पाखरा, सोडी सोन्याचा पिंजरा... धृ।
तुजभवती वैभव माया, फळ रसाळ मिळते खाया
सुखलोलुप झाली काया, हा कुठवर वेड्या घेसी आसरा... १।
घर कसले ही तर कारा, विषसमान मोती चारा
मोहाचे बंधन द्वारा, तुज आडवितो हा कैसा उंबरा... २।
तुज पंख दिले देवाने, कर विहार सामर्थ्याने
दरी डोंगर हिरवी राने, जा ओलांडुन या सरिता सागरा... ३।
कष्टाविण फळ ना मिळते, तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते, का जीव बिचारा होई बावरा... ४।
घामातुन मोती फुलले, श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले, हा योग जीवनी आला साजिरा... ५।

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ अखेरचा हा तुला दंडवत ॥

गायिका: लता मंगेशकर

अखेरचा हा तुला दंडवत
सोडून जाते गाव...

दरी दरीतुन मावळ देवा
देउळ सोडुन धाव रे...

तुझ्या शिवारी जगले हसले
कडी कपारी अमृत प्याले
आता हे परी सारे सरले
उरलं मागं नाव रे...
सोडुन जाते गाव...

घ घ घड्याळ, थ थ थवा, बाळ जरी खट्याळ तरी मला हवा . . . १।
ह ह हम्मा गोड दूध देते, च च चिऊ अंगणात येते
भ भ भटजी, स स ससा, मांडीवर बसा नि खुदकन् हसा . . . २।
क क कमळ पाण्यावर डुले, ब ब बदक तुरुतुरु चाले
ग ग गाडी झुकझुक जाई, बाळ माझे कसे गोड गाणे गाई . . . ३।

film: Sant Tukaram singer: Vishupant Paganix
lyrics: Shantaram Athavale music:

॥ आधी बीज एकले ॥

गायक: विष्णुपंत पागनीस
गीत: शांताराम आठवले
चित्रपट: संत तुकाराम

आधी बीज एकले, बीज अंकुरले, रोप वाढले . . . धृ।
एका बीजापोटी, तरु कोटी, कोटी जन्म घेती सुमने फळे
कोटी जन्म घेती सुमने फळे . . . १
व्यापुनि जगता तूहि अनंता
बहुविध रूपे घेसी, घेसी परि अंती ब्रह्म एकले
घेसी परि अंती ब्रह्म एकले . . . २

film: singer: Asha Bhonsle lyrics: music:

॥ आज कुणितरी यावे ॥

गायिका: आशा भोसले

आज कुणितरी यावे, ओळखिचे व्हावे . . . धृ।
जशी अचानक या धरणीवर, गरजत आली वळवांची सर
तसे तयाने गावे . . . १
विचारल्याविण हेतु कळावा, त्याचा माझा स्नेह जुळावा
हाती हात धरावे . . . २
सोडुनिया घर नाती गोती, निघून जावे तया संगती
कुठे तेही ना ठावे . . . ३

film: singer: Lata Mangeshkar lyrics: music:

॥ ऐरणीच्या देवा ॥

संगीत : लता मंगेशकर
गायिका: लता मंगेशकर

ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे
आभाळागत माया तुझी आम्हावरी . . . राहू दे

लेऊ लेनं गरिबीचं चणं खाऊ लोखंडाचं
जीनं होवं अबरुचं धनी मातुर माझा देवा वागावाणी . . . असू दे

लक्षीमीच्या हातातली दोरी व्हावी वरखाली
इडापीडा जाई आली किरपा तुझी भातातल्या पुडा संग . . . जाऊ दे

सुख थोडं दु:ख भारी दुनिया ही भली बुरी
घाव बसंल घावावरी सोसायाला झुंजायाला अंगी बळ . . . येऊ दे

film: singer: Kumar Gandharva lyrics: music:

॥ आज अचानक गाठ पडे ॥

गायक: कुमार गंधर्व

आज अचानक गाठ पडे
भलत्या वेळी भलत्या मेळी
असता मन भलतीचकडे . . . धृ।

नयन वळविता सहज कुठेतरी
एकाएकी तूच पुढे . . . १।

दचकुनी जागत जीव निजेतच
क्षणभर अंतर्पट उघडे . . . २।

गूढ खूण तव कळुन ना कळुन
भांबावुन मागे मुरडे . . . ३।

film: singer: Asha Bhonsle
lyrics: Suresh Bhat music: Hridyanath Mangeshkar

गायिका: आशा भोसले
संगीत: हृदयनाथ मंगेशकर
कवी : सुरेश भट
चित्रपट: निवडुंग

केंव्हा तरी पहाटे, उलटून रात गेली,

(sometime at the break of dawn, the night passed away)
मिटले चुकून दोळे, हरवून रात गेली
(the eyes shut for a moment and the night was lost)

सांगू तरी कसे मी, वय कोवळे उंहाचे,
(how can I tell the age of the young sunlight)
उसवून श्वास माझ, फ़सवून रात गेली

(undoing? my breath, cheating me, the night went away)

कळले मला न केंव्हा, सुटली मिठी ज़राशी
(I did not realize when my embrace slackened a little)
कळले मला न केंव्हा, निसटून रात गेली
(I did not realize when the night slipped away)

उरले उरात काही, आवाज़ चांदण्यान्चे,

(all that was left in me, were a few sounds of the stars)
आकाश तारकान्चे, उचलून रात गेली
(lifting the sky of stars, the night went away)

स्मरल्या मला न तेंव्हा, माझ्याच गीत पंक्ती
(I couldn't remember then, the lines of my own song)
मग ओळ शेवटाची, सुचवून रात गेली
(then hinting at the last line, the night slipped away)

केंव्हा तरी पहाटे ...

film: singer: Shrikant Pargaonkar
lyrics: Suresh Bhat music: Sudhir Moghe

Prelude: दुखाच्या वाटेवर गाव तुज़े लागले
(along the path of sorrow, I passed your town)
थबकले न पाय तरी, ह्रिदय माज़े थाम्बले
(though my feet never paused, my heart stopped)
वेशिपाशि उदास हाक तुझी भेटली
(at the outskirts, your sad call met me)
अन माझि पायपीट दोळ्यातून सांडली
(?? my wandering spilt through my eyes ??)

स्थायि: मग माज़ा जीव तुझ्या वाटेवर वणवणेल
(then my being will roam in your path)
अन माझि हाक तुझ्या अंतरात हुरहुरेल
(and my call will echo within you)

१) सहज़ कधी तू घरात लावशील सांज़ वात
(often times, you will light the evening lamp at home)
माज़े ही मन तिथेच ज्योती सह थरथरेल
(my mind, too, will flicker there, along with the flame)

२) जेंव्हा तू नाहशील, दर्पणात पाहशील,
(when you bathe and look in the mirror)
माज़े अस्तित्व तुझ्या आसपास दरवळेल
(my spirit will be hovering around you)

३) जेंव्हा रात्री कुशीत, माज़े घेशील गीत,
(when at night in bed, you will remember my song)
माज़े तारुण्य तुझ्या गात्रातून गुणगुणेल
(my youth will hum through your voice)

४) मग सुटेल मंद मंद, वासंतिक पवन धुंद

(then there will be a gentle, fragrant, intoxicating breeze)
माज़े आयुश्य तुझ्या अंगणात टपटपेल
(and my life will shower, drop by drop, in your garden)

॥ अ आ आई म म मका ॥

अ आ आई, म म मका, मी तुझा मामा, दे मला मुका ... धृ।
प प पतंग आभाळात उडे, ढ ढ ढगात चांदोमामा दडे